## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य



तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )
www.prabhutarun.com

: संपादिका :
सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :
मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



## प्रभु तरुण आश्रयदाते

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



**वर्ष ८५ वे) प्रभुतरुण मुंबई, शुक्रवार, ता. १६ माहे एप्रिल, सन २०१० (अंक ९६९**


*संपादकीय*

## सुगंधित मौन

**-सुहासिनी कीर्तिकर**

परवा परवा 'ज्ञानपीठ' मिळवणारा ज्ञानमहर्षी गेला. 'यंत्रमानवा'वर विश्वास ठेवणारा, माणुसकी जपणारा महान 'माणूस ' गेला. माणसाची असोशी स्पर्शातूनच कशी पालवते ते 'स्पर्शाची पालवी'मधून सांगणारा सर्वस्पर्शी निबंधकार गेला. 'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र' आणि 'किंग लिअर' उत्तम मराठीत आणणारा इंग्रजी साहित्याचा अभ्यासक गेला.

*'एकदा विमानात शिरला उंदीर*
*तरी प्रवाशांनी धरला धीर;*
*त्याच्यामागून साप शिरला*
*तेव्हा सगळ्यांना घाम फुटला.*
*पण दोघांनीही विमानामधून टाकल्या*
*उड्या धडाम्धूड;*
*कारण त्यांनी केबिनवरची वाचली*
*पाटी 'कॅप्टन गरूड.'*

-असे कल्पक विनोद करून लहानापासून थोरांना रिझवणारा अस्सल बालकवी गेला. मार्मिक विडंबन, विचारी भाष्य आणि समाज-मनाचे इंगित जाणत अट्टल कविता देणारा, 'तेच ते नि तेच ते'मधील निरर्थकत्व दाखवणारा अर्थपूर्ण, अस्सल नवकवी गेला. आचार-विचारांनी कणखर अशा जगण्यानं परखड समीक्षा करणारा गेला.

'ज्ञानमहर्षी' हे विशेषण विशेषनाम म्हणून वापरताना 'गेला', 'गेला' म्हणत कविवर्य विंदा करंदीकरां-विषयी एकेरी क्रियापद वापरताना 'मन माझे' जराही कचरत नाही. आदर असूनही जशी विठ्ठलाची 'विठाई' होते किंवा 'लता काय सुंदर गाते' म्हणत जवळीक साधली जाते ती आंतरिक नात्याने. 'विठ्ठलपंत' किंवा 'लता मंगेशकर काय सुंदर गातात' असं म्हणण्यात फक्त वस्तुस्थितीचे विधान (स्टेटमेंट ऑफ फॅक्ट) केले जाते. त्यापलीकडे जवळीक साधायला 'ज्ञानेश्वरां'चा 'ज्ञानोबा' व्हायला लागतो. हे विंदांच्या लेखनातून, कवितेतून, वागण्यातून घडत होतें. म्हणूनच 'गेला', 'गेला' म्हटलं. भाव तोच. त्यांच्या जाण्यानं होणारं दुःख तेच. त्यांच्या कवितेसाठी 'तिच्यासाठी माझी मिठी' आजही तीच. त्यांना प्रत्यक्षात भेटल्यानंतर मनाच्या तळात साचत गेलेल्या त्यांच्या संदर्भातल्या 'प्रत्यक्ष' आठवणीही त्याच!

त्यांना 'ज्ञानपीठ' मिळालं तेव्हा या आठवणींना मी याच माझ्या 'संपादकीया'तून उजाळा देत त्यांचं अभिनंदन केलं होतं. त्या आठवणींतून आणि त्यांच्या लेखनातूनही 'अंतस्थ' असलेले 'विंदा'; 'गेले', कसे म्हणायचे? ते आहेतच. असणारच आहेत. परवा 'देहदान' केलेला त्यांचा देह 'फुलराणी'त विसावलेला पाहिला. साहित्य संघातर्फे त्यांना हार घालताना असं वाटलं की 'नेत्रदान' करूनही त्यांचा एक 'चक्षू' उघडा आहे! माणसाच्या प्रवृत्तीकडे मिश्कीलीनं पहातो आहे. 'हारांसाठी इतका खर्च केलात; हे पैसे कुणाच्या भाकरीसाठी का वापरले नाहीत?' असा प्रश्न ते त्यांच्या खडखडीत आवाजात करताहेत. पण आम्ही कसचे? 'माझ्या मना बन दगड' म्हणत त्यांच्या भोवताली मांडलेल्या पुस्तकांतून, पारितोषकांमधून हिंडताहोत आपले! पण तरीही 'समग्र विंदा' आपलेच होते; हे निश्चित. त्यांना 'ज्ञानपीठ' मिळालं अन् साहित्य संघानं त्यांचा गौरव करायचा ठरवलं. सगळी जबाबदारी

(पान २, कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## शब्द

- संजना कोठारे



**विष्णुपंत कोठारे**

शब्दाला रूप नसतं, आकार नसतो, शब्द वळवावे तसे वळतात, शब्द तोडावे तसे तुटतात. काहीही म्हटलं, तरी शब्दांना मात्र भावना नक्की असतात. शब्दांवर अमाप प्रेम करणारी माणसं आहेत ज्यांनी शब्दांना आकार दिला. सुंदर रूप दिले आणि प्रेम करणारी माणसं आहेत ज्यांनी शब्दांना आकार दिला, सुंदर रूप दिले आणि त्याच सुंदर शब्दांचा संच करून आपल्या भावना व्यक्त करण्याचा मार्ग दाखविला. ह्या लेखणीतूनच आपलं आयुष्य जुळलंय आणि आयुष्याचा अर्थ समजण्याची क्षमता मिळालीये. भावना प्रत्येकाच्या मनात असतात, परंतु त्या व्यक्त करणं सर्वांना जमतंच असं नाही. काही जणांना आपल्या मनातल्या भावना व्यक्त करणं कठीण नसतं. परंतु काही कमनशिबी व्यक्ती इच्छा असूनही आपल्या मनातल्या भावना व्यक्त करू शकत नाहीत. लेखक आपल्या मनात दडलेल्या भावनांना रूप देतो जेणेकरून सर्व साधारण मनुष्य आपल्या भावना अनुभवू शकतो आणि त्या मांडायला त्याला लेखकाच्या लेखणीचा आधार मिळतो. हल्ली एसएमएसच्या जमान्यात शायरीतून मनातल्या भावना एकमेकांपर्यंत पोहोचवणं शक्य झालंय, ह्या क्षणी मला एक इंग्रजी गाण्याचे शब्द आठवले जे Boyzoहा ह्या ग्रुपने गायले आहे. गाण्याचे नाव आहे. Words' ज्यात एक ओळ आहे, `Its only words and words are all I have to take your heart away.'

मनुष्यजन्म आपल्या नशिबी आला हे आपलं अहोभाग्य आहे. जो शेकड़ो वर्षानंतर एका आत्म्याला लाभलेला एक अमूल्य योग आहे. देवाच्या ह्या सुंदर देणगीमुळे आपण आपले विचार डोक्यात मांडू शकतो. हृदयात अनुभवू शकतो आणि तेच शब्दात मांडून व्यक्त करू शकतो. हा लाभ इतर प्राणीमात्रांना नाही लाभलेला. परंतु मनुष्य ह्या अनमोल देणगीचा कितपत योग्य उपयोग करतो? शब्दांनी माणसं जशी जोडता येतात तशी तोडणंही कठीण नाही. शब्द उच्चारून नाती बांधली जातात किंवा तोडली जातात तसेच शब्द न उच्चारूनसुद्धा नाती बनतात किंवा बिघडतात. हीच शक्ती आहे ह्या अनमोल देणगीची ज्याचा योग्य तो उपयोग करण्याचे सामर्थ्य केवळ मनुष्याला लाभले आहे.

देवाने आपल्याला भावना दिल्या, त्या व्यक्त करण्यासाठी शब्द दिले, परंतु मनुष्य ह्या शब्दांचा उपयोग किंवा दुरुपयोग अधिक निंदास्पद, किंवा नकारात्मक भावना व्यक्त करण्यासाठी करतो; असं नाही का जाणवत? समोरच्याला दुखावणारे शब्द किंवा कोणाचा दुस्वास करणारे शब्द जास्त कानी पडतात; असं नाही का आपण अनुभवले? परंतु प्रेमाचे दोन शब्द किंवा आपुलकीची दोन वाक्यं, कोणाची प्रशंसा, हे शब्द केवळ कादंबरीपुरते मर्यादित आहेत का? ज्या गोष्टी आपण वस्तुस्थितीत अनभवू

(पान २, कॉलम २ वर)

(पान१, कॉलम२ वरून)

माझ्यावर. पत्र घेऊन भेटीला गेले. त्यांनी पत्र बारकाईनं वाचलं. 'कसं नेणार?', 'कोण येणार मला न्यायला?'; असे प्रश्न विचारत त्यांनी अटी घातल्या. 'कार्यक्रम सहा म्हणजे सहालाच सुरू व्हायला पाहिजे. मी सहा वाजून पंधरा मिनिटांनी बाहेर पडायला हवा. माझ्या घरी गाडी इतक्या म्हणजे इतक्या वाजताच आली पाहिजे. मी भाषण करणार नाऽऽही. कविताही म्हणणार नाऽऽही.' मी आव्हान स्वीकारलं. त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते डॉ. बाळ फोंडके. त्यांना सांगीतलं मी. ते बरोब्बर साडेपाच वाजता आले. विजया राजाध्यक्षांनाही त्यांच्याच गाडीने आणलं. पावणेसहाला विंदांना आणलं आणि ठीक सहा वाजता मी बोलायला सुरुवात केली. 'कविवर्य विंदा करंदीकरांचा सन्मान करून साहित्य संघ स्वत:च सन्मानित होतोय्. त्यांच्याविषयी मोठमोठी विशेषणं न वापरता मी फक्त एव्हढंच म्हणेन की ते सर्वतोपरी 'आपले' आहेत. त्यांनी या आपलेपणातून आमचं आमंत्रण स्वीकारलं. डॉ. बाळ फोंडके यांना विनंती की त्यांनी विंदांना सन्मानित करावं.' बस! फक्त अर्ध मिनिट मोजून मी घेतलं. मग मात्र विंदा उठले. फोंडक्यांना थांबवत म्हणाले, 'मला आपलं म्हटलंत. आपलेपणानं गप्पा नकोत का व्हायला? मी माझ्या कविता म्हणणार आहे.'... मग काय? टाळ्यांचा कडकडाट. विंदांच्या एक दोन नव्हे; चांगल्या सहा कविता. वर पावती.- ''तुम्ही अगदी वेळेवर, काटेकोरपणे आणि आपलेपणाने बोललात. म्हणून मी माझा नेम बदलला.'' आपल्या साधेपणातून, मोठेपणातून सगळ्यांच्या जवळ जाणारे असे हे विंदा!

त्यांच्या मोठेपणाचा मला आणखीही एक अनुभव आलाय्. काय झालं की 'साहित्य'मधून आम्ही 'साहित्यातील मुंबई' हा शोध-प्रकल्प राबवत होतो. मल्हार ढगे तेव्हा संपादक होते अन् मी सहसंपादक. एका अंकाची प्रुफं (मुद्रितं) काही कारणांनी माझ्यापर्यंत आलीच नाहीत. माझा हात, माझी नजर त्यावरून फिरलीच नाही. मी धडपड करून जमवलेल्या साहित्यात काही घोळ झाला अन् त्या अंकात प्रसिद्ध झालेल्या विंदांच्या कवितेतील ओळी एके ठिकाणी वरखाली झाल्या. अंक हाती पडताच माझा जीव खालीवर! मी मल्हार ढगेंना म्हटलं की दिलगिरी व्यक्त करणारं पत्र विंदांना पाठवा. ते बसले गप्प. अपेक्षित तेच झालं. एके सकाळी विंदांचा ढग्यांना फोन. पाठोपाठ मला. फार कठोर शब्द. 'केवळ साहित्य संघ आहे म्हणूनच गप्प रहातोय्. एरवी कोर्टात गेलो असतो.' मी फोनवर त्यांची क्षमा मागितली. ताबडतोब ढगेंना गाठलं. म्हटलं, 'प्रुफं माझ्यापर्यंत आली नाहीत. त्यांना दिलगिरीचं पत्र पाठवलं नाहीत. त्यांच्याकडून फोन येईपर्यंत वाट पहात बसलात? ठीक आहे. मी बाजूला होते-' दिला झालं राजीनामा. कळल्यावर विंदांचा परत अनपेक्षित असा फोन. 'मी रागावून बोलतो; ते तेव्हढ्यापुरतं असतं. उद्या माझ्या घरी या. बोलू सविस्तर. मी गेले. दारात मला पाहिल्यावर म्हणाले, 'अगं सुमे, बाहेर ये. 'माझिये जातीचा' कुणी आलाय्.' अन् मला म्हणाले, 'आनंद झाला. योग्य वाटेवरून चालताय् तुम्ही. मात्र मी सगळं विसरलो बरं का ते.'- हा विंदांचा मोठेपणा! काही वर्षांनी मीच 'साहित्य'ची संपादक झाले. त्यांना अंक मिळाल्यावर त्यांच्या प्रतिक्रिया अधूनमधून माझ्याकडे किंवा इतरांकडे ते व्यक्त करत राहिले. 'योग्य वाटेवरून' चालण्याचा आनंद मला मिळत राहिला. त्यांच्या प्रतिक्रिया हा माझ्या संपादनाचा पुरस्कारच होता.

स्वत:चा मोठेपणा जपत दुसऱ्यांना मोठं करणारे विंदा गेले.

*'उठण्याची पण हिरवी शक्ती*
*आणि असावी करीत वळवळ।*
*मनी असावे मौन सुगंधित*

उरी असावी जगण्याची कळ' असं म्हणून 'जगण्या'ची उमेद वाढविणाऱ्या विंदांना आता त्यांच्या कवितेतून, साहित्यातून, आठवणीतून भेटत रहायचे. मनातील 'सुगंधित मौन' जपायचे. ❑

(पान१, कॉलम४ वरून)

शकत नाही, त्या दुर्लभ भावना आणि शब्दांची ओळख व अनुभव आपल्याला आपले लेखक व कवी मंडळी लेखा व कवितेद्वारे करून देतात.

शब्दांना फुलाप्रमाणे वेचावे, जपावे आणि प्रेमाने त्या शब्दांची उधळण करावी. कारण शब्दांसारखे शक्तिशाली शस्त्र कोणतेच नाही. लेखणीची ताकद तलवारीपेक्षा जास्त असते. तलवारीचे घाव शरीरावर तर लेखणीचे घाव उरावर लागतात. प्रेमाच्या दोन शब्दाने कोणतीही लढाई जिंकणं अशक्य नाही तसेच शब्दांच्या दुरुपयोगांने जिंकलेली लढाई हरायला वेळ लागत नाही. ज्येष्ठ कवी सुरेश भट्ट यांनी लिहिलेले मराठी अभिमान गीत आज इतक्या वर्षांनी पुन्हा एकदा नवीन पिढीच्या कानी पडले. अतिशय सुंदररीतीने संगीतकार कौशल इनामदारांनी एका नव्या चालीवर कवी सुरेश भटचे शब्द गुंतले आहेत. ह्या प्रयोगामुळे आजच्या पिढीला शब्दांचे मोल कळले आणि ह्या पिढीपुढे हे गीत मांडण्याचा संकल्प यशस्वीरित्या पूर्ण झाला. ह्या गाण्याला युवा पिढीनेसुद्धा सलामी ठोकली आणि अप्रतिम प्रतिसाद दिला. तेव्हा शब्दांचं महत्त्व आणि जाण ही काही जणांना तरी आहे हे पाहून मनाला शकून मिळाले. आज पुन्हा एकदा मराठी माणसांच्या मनात मराठी अस्मिता जागृत करण्याचे कार्य कवी सुरेश भटांच्या ह्या कवितेमुळे झाले आहे. कारण केवळ त्यांच्या शब्दांमुळे ह्या युवा संगीतकाराला ह्या शब्दांना वेगळे रूप देण्याचे उत्तेजन मिळाले. नवीन पिढीचे प्रसिद्ध कवी संदीप खरे यांच्या प्रत्येक कवितेत सर्वसाधारण माणसाच्या भावना दडलेल्या दिसतात. त्या शिवाय 'दमलेल्या बाबाची कहाणी' ऐकून स्त्री असो किंवा पुरुष, लहान मूल असो किंवा थोर, प्रत्येकाच्या डोळ्यातून अश्रूंची धार उगाच वाहत नाही. शब्दांची ताकद पुरषी अहंकारालासुद्धा ठेचू शकते हे संदीप खरेंचं गीत सिद्ध करतं.

आपले लेखक, आपले कवी यांनी शब्दांना एकत्रित करून जीवनाचा निरनिराळ्या दृष्टीकोणाशी परिचय घडवून दिला. ह्याच आपल्या महान लेखकांना आणि कवींना माझे नम्र अभिवादन आणि हा लेख त्या महान लेखकांना आणि कवींना समर्पित. अशाच एका लेखकाच्या स्मृतीला अभिवादन म्हणून हा लेख लिहायचा विचार मनात आला. ह्या लेखाचा मान श्री विष्णुपंत कृष्णराव कोठारे, प्रभुतरुण मासिकाचे आद्य संपादक व Founder member यांचा आहे. परंतु त्यांचे नाव ह्या पिढीत कुठेतरी लुप्त झाले आहे ह्याची खंत आहे. ज्या प्रभुतरुणात एवढे नवीन लेखक लेखिका आपले लेख प्रसिद्ध होताना पाहतात त्या मासिकाच्या आद्य संपादकाचे नाव सुद्धा त्यांना माहीत नाही ह्याची खंत आहे. श्री. विष्णुपंत कोठारेंचे नाव किंवा त्यांचा उल्लेख इतके वर्षात केला गेला नाही. परंतु `Its always better to be late than never.' असं मला वाटतं आणि ती कमी पुरी करण्याचं सौभाग्य मला मिळालं ह्याचा मला अत्यंत आनंद वाटतो. श्री. विष्णुपंत कोठारेंबद्दल मला फारशी माहिती नाही. तरी जी काही अमूल्य माहिती मिळाली ती आपणा समोर सादर करतेय. ही माहिती आणि हा लेख लिहायला प्रोत्साहन देणाऱ्या श्री. अनिल राव यांचे आभार मानते.

सन २०१० हे श्री. विष्णुपंत कोठारे यांच्या जन्माचे ११० वे वर्ष आहे. १९०० साली जन्मलेल्या श्री. विष्णुपंत कोठारे यांनी त्या वेळेला मुंबई विद्यापीठातून बी.ए.ची पदवी प्राप्त केली. अत्यंत महत्त्वाकांक्षी असल्याने त्यांना वकील बनण्यात रस होता. एल्.एल्.बी. च्या पहिल्या परीक्षेत ते उत्तीर्ण झाले. परंतु नशीबाने साथ सोडली आणि आर्थिक अडचणीमुळे त्यांना पुढचे शिक्षण सोडावे लागले आणि त्यांचे ते स्वप्न अपुरे राहिले. विष्णुपंतांचे इंग्लिश, लॅटीन, संस्कृत, मराठी ह्या चार भाषांवर प्रभुत्व होते आणि लिखाणाची प्रचंड आवड होती. वकील बनण्याची इच्छा अपुरी राहिली. परंतु विष्णुपंतांनी आपले सर्वस्व ज्ञातीप्रेमापोटी स्वत:ला वाहून टाकले.

श्री. विष्णुपंतांना आपल्या पाठारे प्रभू ज्ञातीविषयी अमाप माहिती होती. समाजसेवेची आवड असल्यामुळे आणि आपली ज्ञाती आणि ज्ञातीयांविषयी प्रेम असल्यामुळे श्री. विष्णुपंत कोठारे ह्यांनी आपल्या मित्रांच्या सहकार्याने प्रभुतरुण हे ज्ञातीवृत्तपत्र स्थापन करण्याचे ठरवले. त्यांच्या जीवश्च मित्रमंडळात श्री. चंद्रमाधव त्रिलोकेकर, श्री. शिवशंकर तळपदे, श्री. मोरेश्वर रणजीत, श्री. माधव धराधर आणि

(पान ३, कॉलम१ वर)

## तारखेवरून वार काढण्याचे कोष्टक

**गो. भ. आगासकर**

आपण मित्रमैत्रिणी, नातेवाईक, शाळा कॉलेजातील सहाध्यायी, अनेक वेळा काही कारणपरत्वे एकत्र जमतो. सुरुवातीचे औपचारिक सुख-संवाद झाल्यानंतर विनोद, नकला, अंताक्षरी, आठवणीतले विचित्र प्रसंगांचे कथन, सोपे जादूचे प्रयोग, पत्त्याचे खेळ, वगैरे करमणुकीचे कार्यक्रम होतात. त्यात आणखी एक कार्यक्रम मी ह्या लेखाद्वारे सुचवित आहे. मला खात्री आहे की तोपण चांगलाच करमणूक करील.

हा कार्यक्रम म्हणजे दिल्या तारखेचा कागदाचा आधार न घेता, तोंडी हिशेब करून काही क्षणातच वार सांगणे. हे एका सोप्या गुरुमंत्राद्वारे सहज शक्य होते. हे मी माझ्या इतक्या वर्षांच्या अनुभवावरून सांगत आहे. कसे ते पहा.-

दिलेल्या तारखेवरून वार काढण्यासाठी पाच घटक आहेत. १) तारीख, २) महिन्याचा मासांक, ३) वर्ष, ४) त्या शतकातील होऊन गेलेली लीप वर्षे व (६) शतकाचा शतकांक.

१) मासांक खालीलप्रमाणे मोजले जातात.

जानेवारी-एक, फेब्रुवारी-चार, मार्च-चार, एप्रिल-शून्य, मे-दोन, जून-पाच, जुलै-शून्य, ऑगस्ट-तीन, सप्टेंबर-सहा, ऑक्टोबर-एक, नोव्हेंबर-चार, डिसेंबर-सहा.

हे अंक लक्षात ठेवण्याची पद्धत फार सोपी आहे. प्रत्येक अंकाचे पहिले अक्षर घेतले असता खालीलप्रमाणे 'गुरुमंत्र' तयार होतो.

'एचाचा, शूदोपा, शूतीस, एचास'

माझा अनुभव आहे की हा 'गुरुमंत्र' एखादी सामान्य व्यक्तीही केवळ पाच मिनिटात पाठ करू शकते.

२) शतकांक खालीलप्रमाणे-

१४-९-१७५२ नंतरचे १८ वे शतक-४, १९ वे शतक-२, २० वे शतक-०, २१ वे शतक-६, २२ वे शतक-४

२-९-१७५२ पूर्वीचे १८ वे शतक-१

१७ वे शतक-२

१६ वे शतक-३, प्रमाणे

आता, तारखेवरून वार काढण्याची

(पान५, कॉलम१ वर)

किस्से कोर्टातले-

## 'संशय खट झोटिंग महा'

-सौ. बागेश्री योगेन परीख

वैवाहिक जीवनामध्ये एक व्यक्ती जर संशय दुसऱ्या व्यक्तीला खूप त्रासदायक ठरते.

एकमेकांवरचा अढळ विश्वास हा वैवाहिक जीवनाचा पाया असतो. आपल्या हक्काच्या व्यक्तीवर दुसऱ्या कुणाची तरी नजर पडली आहे; ह्या नुसत्या विचारातूनच समस्या निर्माण होत असतात. कधी कधी Paranoia ह्या मानसिक विकाराचीही सुरुवात असते.

सुशीलेची घटस्फोटाची केस एका संस्थेमार्फत कोर्टात दाखल झाली होती. तब्बल ९ वर्षे तिने यशवंत बरोबर संसार केला होता. यशवंतनी त्या नऊ वर्षात १० वेळा राहतं घर बदललं होतं. कारण फक्त एकच की त्याला सुशीलेच्या चारित्र्यावर संशय होता. तो सुशीलेला प्रत्येक वेळी म्हणायचा की, 'तो शेजारी राहणारा माणूस बघ तुझ्याकडे टक लावून पाहतोय. त्याअर्थी तुझं त्याच्याशी लफडं असणार' सुशीला दिसायला खरंच सुरेख होती. चारचौघीत उठून दिसणारी होती. त्यामुळेच की काय; यशवंतला एक कॉम्प्लेक्स निर्माण झाला होता. गावी राहणाऱ्या आईवडिलांना शहरातला जावई आपल्या मुलीला मिळाला ह्याचंच अप्रूप होतं. पण सुशीलेच्या लेखी काही वेगळंच वाढून ठेवलेलं होतं.

यशवंत ऑफिसला जाताना घराला बाहेरून कुलूप लावून जायचा. खिडक्यासुद्धा बंद. शहरात त्याचे कुणी नातेवाईक नसल्याने घरी कुणी फारसं येत जात नसे. बाजारहाट पण यशवंतच करायचा. त्यांना एक मुलगासुद्धा होता. मुलगा बालवाडीत जायला लागल्यावर सुशीलेला त्याला पोचवायलावआणायलाजायलालागायचं.तर यशवंतनेनोकरीचसोडली!सततसुशीलेवर पाळतठेवायचा.

सुशीला चित्रकार होती. सुरुवातीला छंद म्हणून चित्र काढायची. यशवंतनं तिला चित्रांचाच धंदा करायला लावलं. तो रंग, कॅनव्हास सर्व आणून द्यायचा. सुशीला दिवसभर पेंटिंग करायची आणि यशवंत ती बाहेर नेऊन विकायचा. आधीचं सेव्हिंग आणि चित्रांच्या विक्रीवर त्यांचा चरितार्थ चालायचा.

ओळखीच्या माणसांनापण घरी यायची बंदीच होती. सुशीलेचे आईवडील गावी. हिची पत्रं पण यशवंत वाचून पोस्टात टाकायचा. न जाणो कदाचित काहीबाही लिहिलं तर! सुशीलेलासुद्धा खुशालीशिवाय काही कळविण्याचा अधिकारच नव्हता.

आणि एक दिवस तिच्या सहनशक्तीचा अंत झाला. नवऱ्याचा डोळा चुकवून, मुलाला घेऊन नेसत्या वस्त्रानिशी तिने चक्क घर सोडलं आणि एका संस्थेत तिने आसरा घेतला. मग संस्थेनंच सर्व काही केलं. यशवंतला बोलावलं. त्याची बाजू ऐकून घेतली. पण सुक्या धमक्या देण्याव्यतिरिक्त यशवंतच्या वागण्या बोलण्यात संस्थेच्या सोशलवर्करना-सुद्धा सुशीलेबद्दल वा मुलाबद्दल मायेचा ओलावा दिसला नाही. सुशीलेनं तर यशवंतची इतकी धास्ती घेतली होती, की पुन्हा त्या आयुष्याचा विचार करण्याची ताकदपण तिच्यात नव्हती. संस्थेनेच तिची घटस्फोटाची केस केली व तिच्या वडिलांना बोलावून सुशीलेला व मुलाला केस संपल्यानंतर सांभाळण्याचं आश्वासन घेतलं. कोर्टात यशवंत यायचा तोच मुळी ओंगळवाण्या स्वरूपात. सुशीला प्रथम प्रथम कोर्टात खूप घाबरायची. संस्थेची वकील व एक बाई सतत तिच्याबरोबर असायच्या. असं असूनही यशवंतने तिला कोर्टाच्या आवारात मारण्याचा प्रयत्न केला. तेव्हा सुशीलेला पोलीस सुरक्षा देण्यात आली.

यशवंतकडे फारसे पैसे नसूनही त्याने वकील उभा केला होता. लेखी स्टेटमेंटमध्ये स्वत:वरचे सगळे आरोप खोडून काढले होते आणि सुशीलाच कशी रंगेल आहे; ह्याचे रसभरीत वर्णन केलं होतं. तिच्या अशा चारित्र्यहीन वागण्याने त्याला नऊ वर्षात १० घरं बदलावी लागली होती. असंही नमूद केलं होतं.

उलट तपासणीच्या वेळी स्वत:च्या वकिलाला न जुमानता यशवंतच सुशीलेला प्रश्न विचारीत असे. त्याचे अर्धे प्रश्न संदर्भरहित असत.

सुशीला कोर्टातसुद्धा डोक्यावर पदर घेऊन यायची. एकदा केस चालू असताना चुकून तिचा पदर डोक्यावरून पडला तर यशवंतचा रागाचा पारा खूप चढला. ''पदर डोक्यावर ठेव. नाहीतर मी डोक्यावर खिळा मारीन''अशी धमकी यशवंतने तिला भर कोर्टात दिली.

''माझी हक्काची बायको आहे. येत नाही म्हणजे काय? खेचून घेऊन जाईन'' अशा धमक्यासुद्धा तो वारंवार देत असे.

सुशीलाला ह्या केसमध्ये फारसं सिद्ध करायला लागलं नाही. पोटगी तर तिला स्वत:साठी किंवा मुलासाठी सुद्धा नकोच होती. यशवंतचं कोर्टातील वागणं व सुशीलाने सादर केलेले पुरावे ह्यावरून एव्हढाच निष्कर्ष निघत होता की, सुशीलेला कुठल्याही परिस्थितीत यशवंतबरोबर संसार करता येणं शक्य नव्हतं.

यशवंतमध्ये स्वभावदोषच होता. अशाप्रकारचे स्वभावदोष सुधारण्या पलिकडचे असतात. मग असं वाटतं की, अशा जबरदस्तीच्या लग्न-जीवनापेक्षा घटस्फोटीत आयुष्य शंभर टक्के चांगलं. निदान स्वाभिमानाने व आत्मविश्वासाने जगता तरी येईल. पण त्यासाठी उठसूट किरकोळ सवयींचं/ गोष्टींचं भांडवल केलं जाऊ नये. व्यक्तीला सुधारण्याच्या सर्व शक्यता पडताळून घेतल्यानंतरच अशी पावलं उचलावीत. ❑

(पान२, कॉलम४ वरून)

श्री दादा जयकर ह्या मंडळींचा समावेश होता ज्यांच्या सहकार्याने प्रभुतरुण २५ ऑगस्ट १९२३ रोजी स्थापन झाला. प्रभुतरुणाच्या ह्या fouonder members मधून श्री. विष्णुपंत कोठारे हे प्रभुतरुणाचे पहिले संपादक झाले.

प्रभुतरुण स्थापन करण्यापूर्वी विष्णुपंतांनी' प्रभुमासिक' ह्या आपल्या ज्ञातीच्या पहिल्या मासिकातही आपल्या लेखणीचे योगदान केले. श्री. विष्णुपंत कोठारे यांचे लक्ष्यवेधी कर्तृत्व म्हणजे लगातार ४७ वर्षे त्यांनी निभावलेली संपादकाची भूमिका. त्यांच्या ह्या कर्तृत्वाची दखल नवी दिल्लीच्या 'ऑफिशीयल गव्हर्मेंट रेकॉर्ड' ने घेतली आणि त्यांच्या नावाची नोंदणी ह्या रेकॉर्डमध्ये केली गेली. आपल्या ज्ञातीयांना अभिमान असायला हवा की एक पाठारे प्रभू आहे ज्यांनी लगातार ४७ वर्षे एका मासिकाच्या संपादकाची जबाबदारी स्वीकारली आणि त्या कर्तृत्वाची नोंद सरकारी रेकॉर्डमध्ये केली गेली आहे.

श्री. विष्णुपंत कोठारे यांनी आपल्या पाठारे प्रभु चॅरिटीजच्या ५०व्या वर्षाच्या सोविनरमध्येसुद्धा आपल्या लेखनाने अमूल्य योगदान दिले आहे. त्यात एक आश्चर्यजनक गोष्ट आढळली की 'पट्टेराव' आणि 'कोटकर' ही दोन आडनांवसुद्धा आपल्या पाठारे प्रभू ज्ञातीत असायची. परंतु ह्या आद्यनावांना 'कांचोले'म्हणून ज्ञाती बाहेर केले गेले. श्री. विष्णुपंतांचे लिखाण अत्यंत स्पष्ट, सरळ असायचे. कारण ते कायम सत्याला धरून लिहायचे. प्रभुतरुणाचे ब्रीद वाक्य त्यांच्या लिखाणाला सार्थ करीत असे. 'तत्त्वाचा बंद जीव मूर्तीला कोण विचारी.' शब्दांना मान देऊन सत्याला कायम प्राधान्य देऊन श्री, विष्णुपंतांनी ४७ वर्षांचा प्रभुतरुणाचा वारसा पुढे आपले चिरंजीव श्री. सुहास कोठारे यांना दिला.

'दिवस ढळताना कळून चुकतं की आता आठवणीतून सुटका नाही. हे तर कण कण जळणं झालं, ह्या क्षणाचा चटका नाही.' माझे आवडते कवी चंद्रशेखर गोखले ह्यांच्या शब्दांशिवाय माझा लेख अपुराच वाटतो आणि ह्या त्यांच्या चारोळीच्या आठवणीतून आठवले ते शब्दांवर अमाप प्रेम करणारे आणि मुख्यत: योग्य शब्द योग्य रीतीने उच्चारणारे प्रभुतरुणाचे माजी संपादक श्री. सुहास कोठारे ज्यांचे स्मरण केल्याशिवाय ह्या शब्दांना न्याय मिळणार नाही. शब्द, लेख, लेखणी, प्रभुतरुण आणि त्यांची अखेरी लिहिलेली कवितासुद्धा. ह्या सर्व शब्दांचा समानार्थी शब्द आहे श्री. सुहास कोठारे! प्रभुतरुणाला साहित्यिक उंचीवर नेण्यात श्री. सुहास कोठारे यांचा सिंहाचा वाटा आहे ज्यांनी शब्दांचे मोल जाणले आणि शब्दांचा योग्य उपयोग केवळ माणसं जोडण्याकरिता केला.

आपण पुढे सरतो, तसे आपण, प्रगतीच्या मार्गावर मागंच विसरून पुढचं पाऊल टाकायला शिकवलं जातं. ज्यामुळे ह्या पिढीला गेल्या काळाबद्दल काहीच माहिती नाही. प्रगतीचे द्वार पुढे असले तरी काही शिकवण घ्यायला मागे वळून पाहावं लागतंच नाहीतर वस्तुसंग्रहालयात इतिहास जपण्याची गरज कोणाला भासलीच नसती. आपल्याला आपल्या ज्ञाती इतिहासाची जाण नाही. कारण ज्ञातीचा इतिहास जाणण्याचा प्रयास ह्या पिढीने कधीच केला नाही आणि त्याबद्दल माहिती असण्याची गरज कोणाला भासली नाही. परंतु आपल्या ज्ञातीच्या समाजसेवकाच्या कर्तृत्वाची केवळ एक नोंद व्हावी म्हणून हा विशेष लेख ह्या वृत्तपत्राच्या आद्य संपादकाला समर्पित. शब्दांची ताकद अशी न्यारी. ह्या शब्दांना योग्य रूप देणाऱ्या ह्या सर्व शिल्पकारांना माझे नम्र अभिवादन. ❑

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



# YUVA MANCH
Together Towards Tomorrow

## आयपीएल, पुणे टीम आणि पुणेरी पाट्या

-सीमित देसाई

नेटवरून घेतलेलल्या खास पुणेरी पाट्या आमच्या खास वाचकांसाठी संकलीत -संपादक



शेवटी येणार येणार म्हणता पुण्याची आय पी एल टीम आली. आता आम्ही वाट पाहतो आहे ती टीमच्या नावाची आणि त्यातल्या खेळाडूंची ती येईल तेव्हा येईल पण एक (भविष्यातील) पुणेकर ह्या नात्याने आम्ही काही ‘पुणेरी पाट्या’ लागोलाग ठेवत आहोत. पुढे त्याची अर्थातच गरज पडेल ह्याविषयी आमच्या मनात अजिबात संदेह नाही.

ह्या पाट्या आहेत त्या ‘आयपीएल-पुणे संघाच्या कार्यालयातल्या.’

१. फक्त दिवसाचे सामने खेळले जातील. त्यातही दुपारी १-३ असा विश्रांती वेळ राखून ठेवावा लागेल.

२. रात्रीच्या सामन्याचा चार्ज वेगळा पडेल. कुठल्याही परिस्थितीत रात्री ८ वाजता सामना संपविण्याची जबाबदारी आयोजकांची राहील. सवड मिळाल्यास उरलेला सामना दुसऱ्या दिवशी खेळता येईल.

३.सोमवारी सुट्टी घेतली जाईल.

४. सर्व लोकांना जाहीर निवेदन देण्यात येते की, ‘आयपीएल-पुणे’ संघ (पुण्याचा अभिमान-महाराष्ट्राची शान)’ हा आमचा पूर्णपणे स्वतंत्र संघ असून ‘मुंबई इंडियन्स महाराष्ट्र’ या संघाशी आमचा कसलाही संबंध नाही. त्या संघाशी केलेल्या व्यवहाराची जबाबदारी केवळ तो मराठी आहे ह्या कारणाने घेतली जाणार नाही. तसेच त्या संघाच्या विषयी आमच्याकडे कसलीच चौकशी करू नये.

५. हा क्रिकेटचा संघ आहे. उगाच गाण्याच्या स्पर्धा, नाचकामाचे कार्यक्रम, पाणपोईचे उद्घाटन, नव्या दुकानाची चित्रफीत कापणे ह्या आणि अशाच इतर कामांसाठी खेळाडूंची चौकशी अथवा मागणी करू नये.

६. क्रिकेट हा एक खेळ आहे ह्याचे भान ठेवावे. आम्ही मॅचफिक्सिंग करत नसल्याने जिंकण्याची कसलीच गॅरंटी देता येणार नाही.

७. देणग्या मागणारे, गौरवनिधी सामने आयोजित करणारे, फुकटात जाहिरातीसाठी कार्यक्रमाला हजेरी लावण्याची विनंती करण्याची शिष्टमंडळे आदी तत्सम व्यक्ती किंवा संस्था ह्यांना सक्त बंदी आहे. ह्यात कोणत्याही कारणास्तव बदल होणार नाही.

८. आमचे प्रतिस्पर्धी संघ कमी किमतीत खेळत असल्याच्या बढाया आमच्यासमोर मारू नये. आमच्या इथे क्वालिटीला प्राधान्य असल्याने कमी किमतीत सामना खेळवण्याचा विचार केला जाणार नाही.

९. आपण आमच्या खेळाबद्दल समाधानी असाल तर इतरांना सांगा, नसाल तर योग्य आणि सभ्य शब्दात आम्हाला सांगा, योग्य दखल घेतली जाईल.

१०. आमचेकडे शाळकरी संघाना ट्रेनिंग दिले जात नाही.

११. आमच्याशी ठरलेल्या करारानुसार सामना झाल्यावर आमच्याकडून सदीच्छा म्हणून खेळाडूंचे टी-शर्टस्, टॅक सुटस्, टोप्या, बॅटी, चेंडू अथवा तत्सम कुठलेही किमती सामान भेट मिळणार नाही. उगाच हावरटपणा करू नये.

१२. स्त्रियांचे स्वच्छतागृह, खेळांडूचे पॅव्हेलियन, चियरलिडर्स पोडियम, व्हीआयपी गॅलरी, पत्रकारकक्ष इत्यादी ठिकाणी उगाच जास्त घुटमळू नये.

१३. सामन्यातील कसल्याही घटनेचा (सामना हरणे, षटकार मारणे, धावबाद होणे, झेल टाकून देणे वगैरे) राग खुर्च्यांवर काढू नये.

१४. सामना पाहायला आलेल्या प्रेक्षकांचे खेळाडू, चियरलिडर्स पोडियम, व्हीआयपी यांच्याबरोबर अथवा खेळपट्टी पत्रकार कक्ष, समालोचन खोली, पॅव्हेलियन, व्हीआयपी बॉक्समध्ये इथे ‘फोटो काढून मिळणार नाहीत’ किंवा त्याला परवानगी दिली जाणार नाही.

१५. सामन्यांच्या वेळेदरम्यान तुटलेल्या चपला, कापलेले खिसे, मोडलेला चष्मा, हरवलेली पर्स, गायब झालेला मोबाईल ह्यांची जबाबदारी आयोजकांकडे राहणार नाही. समोरच पोलीस स्टेशन आहे, तिकडे

(पान ५, कॉलम २ वर)

## विठ्ठला! कशी वाहू मी मराठीची धुरा...

-चारुदत्त धैर्यवान

मी मराठी, करत आपण मराठी भाषिकांनी २७ फेब्रुवारी मराठी भाषा दिन साजरा करायचे ठरवले. मी ही ठरवलं की जास्तीत जास्त ह्या दिवशी मराठीतच बोलायचे.

सकाळी उठलो आणि मुलीच्या कराटेच्या सरांना (मास्तरांना) मोबाईलवर (भ्रमणध्वनीवर) कॉन्टॅक्ट (संपर्क) केला आणि आज क्लास (वर्ग) आहे का विचारले. झालं, इथेच चक्क मी इंग्रजी-मराठीमिश्रीत भाषेत बोललो आणि मराठी दिनाची सुरुवात केली.

नंतर नेहमीप्रमाणे बस/'तिकीट/ स्टॉप वगैरे शब्द वापरत दिनक्रम चालू झाला. त्यात मुस्लीम बांधवांची ईद होती. त्यामुळे शेजाऱ्यांना हिंदीत शुभेच्छा दिल्या. सर्व परिचीत मुसलमान त्यांच्या सणानिमित्त बाहेर होती. तेव्हा जवळ जवळ शेकडो लोकांशी हिंदीतच संवाद होत होता.

दुपारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मराठी दिनानिमित्त ग्रंथ दिंडीचे आयोजन केले होते. मी मनाशी ठरवले की जरा वेळ काढून त्यात सहभागी व्हायचं आणि थोडावेळ मराठी भाषिकांसमवेत घालवायचा.

मनसेच्या कार्यकर्त्यांची जय्यत तयारी चालू होती. लहान मुलंमुली, स्त्रियापुरुष आणि वृद्ध असे सर्वजण अगदी महाराष्ट्रीय पोशाख करून मिरवणूकीसाठी जमली होती. वातावरण हळुहळू मराठमोळं होत चाललं होतं. तेवढ्यात कानी काही शब्द पडले- ‘अरे इथला फेमस झेरॉक्सवाला कुठे आहे?’ जमलेल्या मंडळीतील काही जण चपापली आणि मग फेमस आणि झेरॉक्ससाठी मराठी शब्द शोधायला लागली. आहे की नाही गम्मत? आपण सहजरित्या असे अनेक शब्द वापरतो जे मराठीत नाहीत. काय करणार? मुंबईसारख्या शहरात राहिल्या कारणाने आपल्या प्रगत होत चाललेल्या जागतिकीकरणाने आपली बोलीभाषा अनेक भाषेतील शब्द जुळवून एकमेकांशी आपण संवाद साधतो. तेव्हा ह्या शब्दविश्वात आपल्या मातृभाषेतील शब्द आपण विसरून त्याच्या अर्थाचे दुसऱ्या भाषेतील शब्द वापरतो. आता पहा. मी जर का खाली दिलेली वाक्ये म्हटली; तर समोरची व्यक्ती मला नक्कीच वेडा म्हणेल.

उदा- ‘सचिन तेंडूलकरने लंबदंडगोलपिंड धरपकड स्पर्धेत नवा विश्व विक्रम केला.’

किंवा

‘मी गावाला जाण्याकरिता अग्नीरथ विश्रामधामला जात आहे.’

तुम्ही सांगा; जर मी तुमच्याशी वरील शब्द वापरून बोललो तर... तुम्ही नक्कीच माझ्याशी बोलणार नाही. हा! हा!

मलादेखील एवढे शुद्ध मराठी बोलता येत नाही. जर प्रयत्न केला तर नक्की बोलू शकेनच असे नाही. आपण जर धर्मेंद्रचा ‘चुपके चुपके’ सिनेमा पाहिला असेल तर त्यात शुद्ध हिंदी बोलल्याने काय धमाल येते ते आठवा.

तेव्हा आपल्याला कितीही वाटले तरी आजच्या दिवसात शुद्ध मराठी बोलणं जरा कठीणच आहे. मराठीच काय; पण आपल्या भारतातील इतर स्थानिक भाषांचेदेखील हेच होत चाललंय.

मराठी माणसाला नक्कीच विचारावसं वाटेल- विठ्ठला! कशी वाहू मी मराठीची धुरा?

❑





Pratyush is back. Remember the blast we had in 2009... Join in to recreate the magic. Calling all aspiring actors and dancers (age no bar) to participate in the grand celebration Pratyush '10 to be held on 5th June at Rangsharada, Bandra (W.) Contact the following at the earliest:

Sanjana Kothare 9833110993, Mayura Nayak 9819932740
Kashmira Ajinkya 9819841146, Sushmita Kothare 9769860909

(पान२, कॉलम ४ वरून)

पद्धत- १) तारीख, २) महिन्याचा मासांक, ३) वर्ष, ४) दिलेल्या वर्षांपर्यंत त्या शतकात आलेली लीप वर्ष. ५) शतकाचा शतकांकर्षे.

एकूण बेरीज तोंडी करून त्याला ७ ने भागणे. शिल्लक राहिलेला अंक खालीलप्रमाणे दिवस किंवा वार दर्शवितो. शिल्लक-१- रविवार, २- सोमवार, ३-मंगळवार याप्रमाणे.

आता काही उदाहरणे घेऊ.

१) २३-७-१८५६- लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचा जन्मदिन-

जुलै महिन्याचा मूल्यांक-०, शतकांक-२, एकूण बेरीज- २३+०+५६+१४+२=९५

९५ ला ७ ने भागले असता बाकी ४ म्हणजे बुधवार

२) १-८-१९२०- लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचा निर्वाणदिन.

ऑगस्ट मासांक-३, शतकांक-०

एकूण बेरीज१+३+२०+५+०=२९, बाकी१म्हणजे रविवार.

याला एक अपवाद- दिलेली तारीख लीपवर्षाच्या जानेवारी किंवा फेब्रुवारीमधील असल्यास एकूण बेरजेतून एक वजा करणे

उदा. २९-२-१८९६ - मोरारजी देसाईंची जन्मतारीख

फेब्रुवारी मासांक-४, शतकांक+२

एकूण बेरीज- २९ + ४ + ९६ + २४+ २-१=१५४ बाकी-० म्हणजे शनिवार,

वर दिलेल्या उदाहरणांवरून दिसून येईल की 'गुरुमंत्र' पाठ असल्यास तारखेवरून वार काही सेकंदात आपण काढू शकतो.

ह्या संदर्भात मला आलेला एक विलक्षण अनुभव सांगावासा वाटतो. लो.टिळक ह्यांचा एक भव्य पुतळा मुंबईच्या चौपाटीवर उभारला आहे. त्या स्मारकाच्या स्तंभावर खालील-प्रमाणे नोंद सुरुवातीला केली होती.

'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक
जन्म- २३ जुलै, १९५६-सोमवार
मृत्यू-१ ऑगस्ट १९२०-रविवार'

एखादी तारीख दिल्यास त्या तारखेचा वार काढण्याचा छंद मी अनेक वर्ष जोपासला आहे. त्याप्रमाणे १९५४ मध्ये मी एकदा चौपाटीवर गेलो असताना हा पुतळा पाहिला व त्या स्तंभावरील नोंद वाचली. माझ्या तात्काळ लक्षात आले की जन्मतारीख बरोबर असल्यास जन्मदिन बुधवार येतो. तरीपण लो. टिळकांसारख्या थोर विभूतींच्या स्मारकावर चुकीचा मजकूर असणे असंभवनीय आहे; असे वाटले म्हणून मी त्यावेळचे पुण्याच्या दै. केसरीचे संपादक, श्री. ज. स. करंदीकर यांना तात्काळ पत्राने माझी शंका विचारली, व बरोबर काय आहे ह्याचा खुलासा करण्याची विनंती केली. श्री करंदीकरांनी उलट टपाली मला कळविले की पूर्वी पंचांगात सप्ताहाचे वार सोम. भौम, सौम्य, बृहस्पद, वगैरे संज्ञानी ओळखिले जात. बुधवार हा सौम्यवार असल्यामुळे तसा उल्लेख नोंदीच्या मसुद्यात केला असणार व कारागिराने त्याचा सोमवार केला असणार. हे कळताच १९५६ मध्ये लो. टिळकांचा जन्मशताब्दी महोत्सव व्हावयाचा असल्याने त्यापूर्वी त्यांच्या पुतळ्यावरील नोंदीत योग्य तो बदल करावा असे मी मुंबई नगरपालिकेच्या उपायुक्तांना कळविले व थोड्याच दिवसात त्या नोंदीमुळे सोमवारचा बुधवार केला गेला. पण माझ्या पत्राची पोहोच द्यायला किंवा माझे आभार मानायला म.न.पाला जरूरीचे वाटले नाही. अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे मी ह्याच्यासंबंधी पत्र आपल्या ज्ञातीतील सदगृहस्थांना (जे त्यावेळेस म.न.पा.चे उपायुक्त होते त्यांना) पाठविले होते.

मी सुचविलेला हा खेळ गुरुमंत्र पाठ असल्यास जरूर पाहावा. वार कधीच चुकत नाही. ग्रुपमध्ये असल्यास आश्चर्योद्गार निघतात व खेळ करणारा भाव खाऊन जातो.

मला आता प्रश्न पडतो. तारीख दिल्यास त्याचा वार काढण्यासारखे तारीख दिल्यास तिथी सांगणे शक्य आहे का? जसे, २७ ऑक्टोबर १९१७ला कोजागिरी पौर्णिमा होती. २१ ऑगस्ट १९१८ला नारळी पौर्णिमा होती.

वाचकांपैकी एखाद्यास ह्याची माहिती असल्यास ती कळविल्यास मला आनंद होईल.

❑

## भावांजली

❀ श्रीमती प्रफुल्लता तळपदे या बी.पी.एस. शाळेत आदर्श शिक्षिका होत्या. त्याच शाळेच्या पुढे त्या व्यवस्थापन समितीच्या सदस्या झाल्या. शिक्षणक्षेत्रात सुधारणा व्हावी म्हणून त्या नेहमीच कार्यरत असत. त्यांना आमची आदरांजली.

❀ श्रीमती विमल रमण देसाई या शास्त्रीय संगीतातील दर्दी होत्या. व्यंकटेश मंदिरात त्यांनी रंगवलेली मैफल अजून स्मरणात आहे. भक्ती, कला यांचा साक्षात् संगम म्हणजे विमलताई. त्यांच्या घरी पूजेअर्चेला होणारी त्यांची कलापूर्ण आरास, अतिथ्य यांनी भक्ती सगुणरूप घेत असे. सोशल समाजाच्या अभंगयात्रेतही त्या सामील होत. त्यांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली.

(पान ४, कॉलम २ वरून)

जाऊन तक्रार करावी.

१६.हे पुणं आहे, शिमला नव्हे. उन्हाळ्यात गरम होणारच; पण म्हणून मैदानात सामना पाहायला शर्ट काढून बसू नये. अशा निर्लज्ज प्रेक्षकांना बाहेर काढले जाईल.

१७.पाऊस पडल्यास पैसे परत मिळणार नाहीत. कृपया हवामान खात्याशी सल्लामसलत करून मगच तिकीट काढावे.

१८.परदेशी खेळाडूंच्या अंगचटीला जाऊ नये. तसेच त्यांना स्थानिक भाषेत गलिच्छ आणि अश्लील शिव्या देऊन वेडावून दाखवू नये. तसेच ते आपले अतिथी आहेत. आपण घरात पाहुण्यांशी असे वागतो का?

१९. राजकीय नेते, सरकारी अधिकारी, स्थानिक दादा ह्यांचा वशिला लावून फुकट पास मागू नये. परवडत नसल्यास झाडावर चढून सामना पाहावा.

२०. वरील सूचना हा चेष्टेचा विषय नव्हे ह्याची नोंद घ्यावी. ह्याची चेष्टा करणाऱ्या प्रेक्षकांना संपूर्ण सामना संपेस्तोवर अंधाऱ्या खोलीत बळजबरीने बसवून ठेवले जाईल.

❑

# एक मागासलेला समाज- एक समज

**-नंदकुमार विजयकर**

**घटना क्र. १**

***स्थळ***- वधू-वर सूचक मंडळाचे कार्यालय

**वधूपिता**- मुलीला स्थळ सुचवा. आम्ही ९६ कुळी मराठा. इतर जातीची स्थळं चालतील.

**संचालक**- आमच्याकडे कोष्टी, कोळी, आगरी जमातीची स्थळं आहेत. हे एक चांगलं स्थळ आहे. मुलगा डॉक्टर आणि जातीने पाठारे प्रभु आहे.

**वधूपिता**-पाठारे प्रभु? छे! छे! एवढ्या खाली जाण्याची आमची तयारी नाही.

**घटना क्र.२**

***स्थळ***-मित्रांचा अड्डा

**मित्र १**- अरे, याची ओळख करून देतो. हा निलेश. निलेश विजयकर

**मित्र २**- विजयकर म्हणजे तुम्ही पाठारे प्रभु, बरोबर?

**मित्र ३**- अरे, हे घोडेखाऊ

**मित्र ४**- म्हणजे काहीही खाऊ आणि सर्व काही पिऊ.

**घटना क्र. ३**

***स्थळ***-लोकसत्ता आयोजित वधू-वर मेळावे

नामसूची क्र. १- ब्राह्मण, दैवज्ञ, सी.के.पी. वगैरे.

नामसूची क्र. २- कोकणस्थ, मराठा, कुणबी इ.

नामसूची क्र. ३- वैश्य, शिंपी, भंडारी, आगरी, कोळी, न्हावी, पाठारे प्रभु व इतरमागासलेले (ओ.बी.सी) वर्ग.

वर नमूद केलेल्या घटना या नमुन्यादाखल आहेत. मित्र हो! आम्ही स्वत:ला उच्चवर्णीय समजतो. आम्ही या मुंबईचे आद्य रहिवासी. सरस्वती आणि लक्ष्मी वरदहस्त लाभलेले आम्ही पाठारे प्रभु. पण जनसामान्यात आपली काय प्रतिमा आहे हे तपासून घेण्याची वेळ आली आहे. आम्ही हौशी आहोत. सगळे सण पारंपारिक पद्धतीने साजरे करतो. आदरा-तिथ्यात आमचा हात कोणी धरणार नाही. आम्ही लोकांना बोलवावं, त्यांना खाऊपिऊ घालावं. त्यांनी आपल्या भुजणं, खडखडलं, आटल्याचं कौतुक करावं. पण बाहेर मात्र 'यांना एवढा खर्च परवडतो कसा?' म्हणून जरा कुचेष्टेचा सूर लावायचा. आमच्या घरी येऊन मेजवानी झोडायची; पण आमच्या घरात असलं अभक्ष-अपेय चालत नाही म्हणून बोळवण करायची. अर्थात हे सर्व आम्ही जाणून आहोत. तरीपण आम्ही आमच्या औदार्यात, आदरातिथ्यात कोठेही कमी पडत नाही. पण बाहेरच्या समाजाने आपल्याबद्दल एक वेगळीच प्रतिमा तयार केली आहे. हे लोक गुलछबू, गुलहौशी आहेत. ऋण काढून सण करणारे आहेत. उधळे आहेत. व्यसनी आहेत; इत्यादी. वेलकरांनी 'अलिबाबाच्या गुहेतून' अनेक रत्ने बाहेर काढली. आपला इतिहास कसा दैदिप्यमान आहे याची जाणीव करून दिली. हेतू हा की, भूतकाळात आम्ही अनेक पराक्रम केले. त्या पराक्रमाची कास धरून वर्तमानात वाटचाल करायची आहे. पण आमची सर्व विद्वत्ता, आमचा सुसंस्कृतपणा, आमचा सुविद्यपणा नजरेआड करून, आमचा हौशीपणाच आधोरेखित होणार असेल, आम्ही कसे छेलछबिले आहोत हीच प्रतिमा सर्वांसमोर उभी राहणार असेल तर आमच्या समाजधुरिणांनी यावर जरूर विचारमंथन करावं.

राहता राहिला प्रश्न लोकसत्ता आयोजित शुभमंगल मेळाव्याचा. तिसऱ्या क्रमांकाच्या यादीतून पहिल्या क्रमांकामध्ये पाठारे प्रभुचं नाव येण्यासाठी काही धडपड करावी असा माझा मनोदय नाही. त्याने काही साध्य होणार नाही. मुळात असली नामसूची प्रसिद्ध करणंच आक्षेपार्ह आहे. आम्ही पुढारलेल्या एकसंध समाजाची अपेक्षा करतो. पण लोकसत्तेने अशी जातीनिहायत नामसूची काढून प्रतवारी लावावी ही खटकणारी बाब आहे. मी 'प्रभुतरुण'द्वारे या धोरणाचा जाहीर निषेध करतो.

शेवटी एकच गोष्ट सांगाविशी वाटते. आम्ही आहोत हे असे आहोत. त्यासाठी काही सिद्ध करण्याची गरज नाही. पण वर उल्लेखलेल्या काही गोष्टी खटकत असतील तर यावर जरूर विचार मंथन व्हावं.

❑


**खूषखबर**

प्रभुतरुणाची वेबसाईट सुरू झाली आहे.

**रु. १०००/- ऐवजी सवलतीची किंमत रु. ५००/- केली आहे.**

आजीव सदस्य व्हा आणि 'ऑन लाइन' प्रभुतरुण नियमित वाचा. पोष्टाचा होणारा विलंब टाळा.

वर्गणी कृपया पुढील पत्त्यावर पाठवावी:-

**डॉ. सुरेखा बन्सी धुरंधर**

नानी निवास, दिक्षीत रोड, विलेपार्ले (पूर्व) मुंबई-५७

वेबसाईट: www.prabhutarun.com

## प्रभुतरुणास देणग्या

❀ कै. श्रीमती मंजुळा नारायण धराधर यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त आणि जन्मशताब्दीवर्ष या निमित्ताने सौ. गीता श्री. आंबवणे यांजकडून रु. ५००/-

❀ श्रीमती दिपाली नंदकिशोर कोठारे यांजकडून त्यांची कन्या सौ. मिनोती कोठारे-पडघेकर यांना पुत्ररत्न होऊन त्याचे अहान (माहीर) असे नामकरण केल्याबद्दल रु. ५०१/-

❀ श्री. रुद्धेश कीर्तिकर आणि ग्रीष्मा कीर्तिकर यांजकडून त्यांचे वडील श्री. उमेशचंद्र कीर्तिकर यांच्या साठाव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. ५०१/-

❀ श्रीमती सुनीता विठ्ठल कोठारे यांजकडून त्यांच्या ७५ निमित्त रु. २५०/-

❀ सौ. स्निग्धा उल्हास कोठारे आणि श्री. उल्हास वामनराव कोठारेंकडून कै. श्री. वामनराव विश्वासराव कोठारे व श्रीमती सीना वामनराव कोठारे स्मरणार्थ रु. १५१/-

❀ सौ. परेशा आणि श्री. उन्मेष प्रकाश नायक, बोरीवली यांजकडून त्यांची कु. पलक हिच्या दहाव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. २५०/-

## परीक्षेतील सुयश

**एमआरसीएस (सर्जरी), एडिंबरो**

पार्ट ३ परीक्षा

श्री. अमित अजित देसाई

**एम एस इन मॅनेजमेंट टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी ऑफ केंटकी, युएस**

श्री. शार्दुल प्रभाकर कोठारे,

प्रथम श्रेणी

## चुकीची दुरुस्ती

गतांकी वेबसाईट सभासद झाल्याच्या नोंदीत डॉ. नंदा राणे-रॉडरिग्ज असे कृपया वाचावे.

## पाठारे प्रभु चॅरिटीज

### वैद्यकीय चिकित्सा शिबीर

रविवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१० रोजी पाठारे प्रभु चॅरिटीज संस्थेतर्फे सुरेश विठ्ठल हॉल, ठाकुरद्वार, मुंबई-४००००२ येथे ४० वे मोफत वैद्यकीय चिकित्सा शिबीर आयोजित केले होते. शिबिराची वेळ सकाळी ९.३० ते २.०० वाजेपर्यंत होती. एकूण ६० गरजूंनी ह्या शिबीराचा लाभ घेतला. अनेक मान्यवर धन्वंतरींची मोफत सेवा व सल्ला ज्ञातीयांसाठी उपलब्ध केला होता. त्यात प्रामुख्याने डॉ. गजानन वामनराव विजयकर (विश्वस्त), डॉ. अरुण वसंतराव जयकर (विश्वस्त), डॉ. प्रदीप गजानन विजयकर, डॉ. तन्मय प्रदीप विजयकर, डॉ. सुनील दत्तात्रय आगासकर, डॉ. विद्याधर सुनील आगासकर, डॉ. सिद्धेश सागर तळपदे, डॉ. सौ. प्रिती भालचंद्र जयकर, डॉ. फुलेन्द्र कोठारे, डॉ. चेतन शहा, डॉ. सौ. चेरी शहा, डॉ. राजेश वालंद, श्री. नितीन जयपाल कोठारे, सौ. रजनी नितीन कोठारे ह्यांनी त्यांची वैद्यकीय सेवा व सल्ला विनामूल्य उपलब्ध केला होता.

ह्या शिबिराचे व्यवस्थापन करण्यासाठी पा. प्र. चॅरिटीजचे विश्वस्त डॉ. गजानन वामनराव विजयकर व त्यांचे चिरंजीव डॉ. प्रदीप गजानन विजयकर ह्यांनी विशेष योगदान दिले.

## अभिनंदन

❀ 'मी मराठी लज्जतदार' आयोजित खाद्ययात्रेत 'कुटुंबसखी' सहभागी झाली होती. श्रीमती वंदना नवलकरांना याचे श्रेय जाते. त्यांना 'महिला उद्योजिका' पुरस्कार मुंबई महानगरपालिकेतर्फे देण्यात आला. अभिनंदन.

❀ 'डीएनए' वृत्तपत्राने धनदिव्यांची दखल घेऊन लेख प्रसिद्ध केला. प्रा. सौ. अनिता सुनील कोठारे, श्री. उदय झावबा, श्री. उदय जयकर यांच्या मुलाखतींनी हा लेख सजला आहे. पाठारे प्रभूंचे कलावैभव या लेखात सचित्र वाखाणले गेले आहे.

❀ 'ई टिव्ही'वर 'हीच माझी मैत्रीण'मध्ये हीना मनिष व्यवहारकरांनी पेपरवर्कचे कौशल्य दाखवले. अभिनंदन.

## पाठारे प्रभु सोशल समाज

समाजाचा १२२ वा वर्धापनदिन श्री. मंदार माधव नायक यांच्या अध्यक्षतेखाली १६ मार्च २०१० रोजी खारच्या सांस्कृतिक केंद्रात साजरा झाला. दरवर्षीप्रमाणे विविध पुरस्कारही प्रदान करण्यात आले. त्याची यादी खालीलप्रमाणे-

❀ कै. श्री. आर. जी. विजयकर स्मरणार्थ ज्ञातीसेवा सुवर्णपदकाचे मानकरी-श्री. सुमंत रामराव तळपदे

❀ उत्कृष्ट दीर्घकालीन ज्ञातीसेवा सुवर्णपदक कै. श्री. सच्चिदानंद मोरेश्वर नवलकर स्मरणार्थ श्रीमती रेखा अनिल विजयकर यांना.

❀ ज्ञातीबाहेरील समाजसेवेबद्दल कै. श्रीमती प्रमिला मोतीराम जयकर स्मरणार्थ सुवर्णपदक सौ. मीना धराधर-आंबवणे यांना.

❀ धार्मिक सेवेबद्दल श्री. रवींद्र वसंतराव जयकर यांना कै. श्री. वामनराव गोरक्षकर स्मरणार्थ.

❀ कै. श्री. प्रमोद सच्चिदानंद नवलकर स्मरणार्थ साहित्यसेवा सुवर्णपदक श्रीमती नलिनी रामराव तळपदे यांना.

❀ कै. श्री. मानकर स्मरणार्थ अभिनेत्री पुरस्कार सौ. सुलेखा धराधर-तळवळकर यांना.

❀ श्री. शीतल नागेंद्र तळपदे पुरस्कृत 'हटके' पुरस्कार श्री. नंदू अरविंद धुरंधर यांना.

अभिनेता, दिग्दर्शक, निर्माता असलेल्या श्री. महेश कोठारे यांचाही सन्मान संस्थेला करायचा होता. मात्र ते कार्यबाहुल्यामुळे उपस्थित नव्हते. शैक्षणिक पुरस्कार सौ. रीटा मंदार नायक यांच्या हस्ते दिले गेले.

समारंभाचा शुभारंभ सौ. क्षमा कोठारे यांच्या सुरेख सरस्वती वंदनेने झाला. त्याला गोड गळ्याची साथ होती सौ. रजनी कोठारे आणि सौ. योगिता नवलकर यांची. अध्यक्षाभिनंदन, समाजगीत, विद्यार्थी गौरव-गीत आणि सरस्वती वंदना अर्थातच नलिनी तळपदे यांच्या टवटवीत लेखणीतून उतरली होती. तबल्यावर श्री. विलास राणे, संवादिनीवर श्री. वसंत मोरे होते आणि दिग्दर्शन श्री.अनंत वेलणकरांचे होते. संयोजन केले होते श्री. राजन चितळे यांनी. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यवाह सौ. नीता सेंजित यांनी केले. समाजाच्या अध्यक्षा सौ. प्रमिला मधुकर तळपदे, विश्वस्त श्री. माधव जयकर, कार्याध्यक्ष स्वाती प्रवीण राणे यांनी प्रास्ताविक, परिचयपर भाषणे केली. सुवर्णपदकाच्या मानकऱ्यांनी सोशल समाजाच्या पूर्वकाळातील कार्याच्या पताका उंचावून जुन्या आठवणींना उजाळा दिला. 'पब्लिक स्पीकींग'चा कोणताही कोर्स न करता सोशल समाजाने वक्तृत्व घडविल्याचा सार्थ अभिमान त्यांच्या भाषणातून डोकावला. नलिनी तळपदे यांनी सुवर्णपदक स्वीकारताना शब्दांचे ऋण काव्यमय शब्दांतूनच फेडले. श्री. सुमंत तळपदे यांनी काठी घेऊन तीन पायांनी चालत पुरस्कार स्वीकारावा लागत असल्याबद्दल खंत व्यक्त करून योग्य वयात हा पुरस्कार देण्यात यावा अशी सूचना केली. अध्यक्ष श्री. मंदार नायक या समारंभासाठी खास जर्मनीहून आले होते. त्यांचे ज्ञातीप्रेम त्यांच्या भाषणात व्यक्त झाले. या प्रसंगी अनेकांनी सोशल समाजाला देणग्या दिल्या. कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आभारप्रदर्शन झाले. देशभावनेसाठी राष्ट्रगीत झाले. उपस्थितांना कुल्फी देऊन सोशल समाजाने वर्धापनदिन आणि पाडवा साजरा केला.

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

२७-२-१० सौ. श्वेता आणि श्री असित अशोक तळपदे, पुत्र आणि कन्या, खार

१४-३-१० सौ. स्वाती आणि अमोल विलास धुरंधर, कन्या, शिकागो

३१-३-१० सौ. प्रीति आणि श्री. नीलेश शशिकांत देसाई, कन्या, बोरिवली

### आत्याबाई नाव बोला

३१-३-१० अथर्व नीलेश झावबा

### नारळसाखर दिला

| | | |
|---|---|---|
| २४-३-१० | श्री आश्विन प्रकाश कोठारे | कु. स्नेहल अरविंद कोठारे |
| १६-३-१० | श्री. श्रेयस राजीव देसाई | कु. निकीता भरत राणे |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १२-३-१० | श्रीमती प्रफुल्लता गजानन तळपदे, | वय ८७, | खार |
| २३-३-१० | श्री. शशिकांत विनायक कोठारे | वय ६०, | मीरा रोड |
| ४-४-१० | श्री. निशांत आत्माराम तळपदे | वय ६०, | माहीम |
| ६-४-१० | श्रीमती विदुला विठोबा कोठारे | वय ८६, | सांताक्रूझ |
| ६-४-१० | श्रीमती शुभा (कस्तुर) प्रभाकर जयकर | वय ८९, | दादर |
| ६-४-१० | श्री. रमेश केशवराव कोठारे | वय ६४, | चौपाटी |
| ६-४-१० | श्रीमती सुनीला रमेश राव | वय ६५, | अंधेरी |


*JOGESHWARI RESORT*

**SANITORIUM**

Under ISHWARI & VIDYADHAR CHARITABLE TRUST No. 14, Divya Hilltop Cottages, Nangargaon, LONAVALA.

Fully furnished Double Bedroom Hall & Kitchen Units Equipped with Gas, Stove, Utensils and Refrigerators available on daily charge basis.

Special concessions available on request for Womens' and Children's Institutions, Aged, Disabled or for other justifiable reasons and medical certificates. Booking made on phone as below. Also available, at the Mumbai address, Wheel Chair, Walkers, Crutches, against refundable deposits only.

Trustees: PRAMILA & MADHUKAR TALPADE
102, ``PRIYA'' Raviraj Oberoi Complex, SAB T. V. Lane,
New Link Road, Andheri (W), Mumbai-400 053.
Tel.: 2630 3902 / 2630 3906 Mobile: 9821447675
Booking Mobile: 09823884094 / 09422543614



॥ श्री इंद्रायणीप्रसन्न ॥ ॥ श्री गुरुदेव दत्त ॥

**प्रकास्व कॅटरर्स**



शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!

आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.

संपर्क :

**प्रवीण धुरंधर**

डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.

फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८